



॥श्री॥

## आद्य शंकराचार्यकृत प्रश्नोत्तरी

(आता 'साधकबोध' या ग्रंथात प्रकरणरूपाने आहे)

साधकाच्या मनात धर्म, नीती, साधन-साधना, अध्यात्म इत्यादी संबंधीचे नाना प्रश्न उद्भवत असतात. ह्याची जाण असणाऱ्या श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी अशा 'संभाव्य' प्रश्नांची आणि त्यांच्या समर्पक उत्तरांची एक प्रश्नोत्तरी संस्कृतमध्ये ग्रथित केली आहे. प्रश्नोत्तरीचे मराठीत भाषांतर करून साधकांना मार्गदर्शन करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

काही श्लोक व अर्थ -

२) बद्धो हि को यो विषयानुरागी का वा विमुक्तिर्विषये विरक्तिः। को वास्ति घोरो नरकः स्वदेहः तृःष्णाक्षयः स्वर्गपदं किमस्ति॥

| | |
|---|---|
| प्रश्न - खरा बद्ध कोण? | उत्तर - विषयांवर प्रेम करणारा, विषयासक्त. |
| प्रश्न - खरी मुक्ती कशात आहे? | उत्तर - विषयांच्या वैराग्यात. |
| प्रश्न - भयंकर नरक कोठे आहे? | उत्तर - आपल्या शरीरात. |
| प्रश्न = स्वर्गप्राप्ती म्हणजे काय? | उत्तर - तृष्णानाश होणे. |

४) शेते सुखं कस्तु समाधिनिष्ठो। जागर्ति को या सदसद्विवेकी। के शत्रवः सन्ति निजेंद्रियाणि। तान्येव मित्राणि जितानि यानि॥

| | |
|---|---|
| प्रश्न - सुखाने कोण झोपतो? | उत्तर - समाधीच्या अनुभवात रमणारा. |
| प्रश्न - शत्रू कोण आहेत? | उत्तर - आपली इंद्रिये. पण तीच जर जिंकली तर मित्र बनतात. |

५) को वा दरिद्रो हि विशालतृष्णः। श्रीमांश्च को यस्य समस्ततोषः। जीवन्मृतः कस्तु निरुद्यमो यः। किं वामृतं स्यात्सुखदा निराशा॥

| | |
|---|---|
| प्रश्न - दरिद्री कोण? | उत्तर - अनिवार तृष्णा असणारा. |
| प्रश्न - श्रीमंत कोण? | उत्तर - कोणत्याही परिस्थितीमध्ये संतुष्ट असणारा. |
| प्रश्न - जिवंत असून मेलेला कोण? | उत्तर - जो पुरुषार्थरहित आहे तो. |
| प्रश्न - अमृत कशाला म्हणतात? | उत्तर - आशारहित सुखद मनःस्थितीला. |

६) पाशो हि को यो ममताभिमानः। सम्मोहयत्येव सुरेव का स्त्री। को वा महांधो मदनातुरो यो। मृत्युश्च को वापयशः स्वकीयम्॥

| | |
|---|---|
| प्रश्न - पाश कोणते आहेत? | उत्तर - ममत्व व अभिमान. |
| प्रश्न - दारू इतकेच मोहित करणारे काय आहे? | उत्तर - स्त्री. |
| प्रश्न - पूर्ण आंधळा कोण? | उत्तर - कामातुर. |
| प्रश्न - मृत्यू कोणता? | उत्तर - स्वतःची अपकीर्ती. |

७) को वा गुरुर्यो हि हितोपदेष्टा। शिष्यास्तु को यो गुरुभक्त एव। को दीर्घरोगो भव एव साधो। किमौषधं तस्य विचार एव॥

| | |
|---|---|
| प्रश्न - गुरू कोण? | उत्तर - हिताचा उपदेश देणारा. |
| प्रश्न - शिष्य कोण? | उत्तर - गुरुभक्तच. |

प्रश्न - जुनाट आजार कोणता? उत्तर - भवरोग.

प्रश्न - त्यावर औषध कोणते? उत्तर - विचार हेच एकमेव औषध.

८) किं भूषणात् भूषणमस्ति शीलं। तीर्थं परं किं स्वमनो विशुद्धम्। किमत्र हेयं कनकं च कांता। श्राव्यं सदा किं? गुरुवेदवाक्यम्॥

प्रश्न - भूषणांमध्ये भूषण कोणते? उत्तर - शील.

प्रश्न - सर्वश्रेष्ठ तीर्थ कोणते? उत्तर - स्वतःचे शुद्ध अंतःकरण.

प्रश्न - या जगात त्याज्य कोण आहे? उत्तर - सुवर्ण व स्त्री.

प्रश्न - नेहमी ऐकावे असे काय आहे? उत्तर - वेद व गुरुवाक्य.

२१) शत्रोर्महाशत्रुतमोऽस्ति को वा। कामः सकोपानृतलोभतृष्णः। न पूर्यते को विषयैः स एव। किं दुःखमूलं ममताभिधानम्॥

प्रश्न - शत्रुंमध्ये सर्वात बलवान शत्रू कोण? उत्तर - क्रोध, असत्य, लोभ व तृष्णा यांच्यासह असलेला काम.

प्रश्न - विषयांच्या भोगांनी कोण तृप्त होत नाही? उत्तर - वरील कामच.

प्रश्न - दुःखाचे मूळ कशात आहे? उत्तर - ममत्वामध्ये.

२३) कस्यास्ति नाशे मनसो हि मोक्षः। क्व सर्वथा नास्ति भयं विमुक्तौ। शल्यं परं किं निजमूर्खतैव। के के ह्युपास्या गुरुदेववृद्धाः॥

प्रश्न - काय बाधित झाले असता मोक्ष मिळतो? उत्तर - मन.

प्रश्न - सर्वथा भयरहित स्थिती कोणती? उत्तर - मोक्ष.

प्रश्न - मनाला सर्वात जास्त टोचणी कशाची लागते? उत्तर - स्वतःच्या मूर्खपणाची.

प्रश्न - उपासना कोणाची करावी? उत्तर - देवता, गुरू व वृद्ध.

२५) के दस्यवः सन्ति कुवासनाख्याः। कः शोभते यः सदसि प्रविद्यः। मातेव का या सुखदा सुविद्या। किमेधते दानवशात्सुविद्या॥

प्रश्न - भामटे कोणाला म्हणावे? उत्तर - वाईट वासनांना.

प्रश्न - (सभेत) कोण शोभून दिसतो? उत्तर - सद्विद्यायुक्त विद्वान.

प्रश्न - आईप्रमाणे सुखद कोण आहे? उत्तर - सद्विद्या.

प्रश्न - देऊन काय वाढते? उत्तर - सद्विद्या.

***